महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा संचालक संवर्गातील पदोन्नतीच्या महसुली विभाग व पदस्थापनेत अंशत: बदल करणेबाबत.

संचालनालय लेखा व कोषागारे
महाराष्ट्र राज्य, मुंबई-०१.
4 AUG 2018
प्राप्त झाले सही.........

**महाराष्ट्र शासन**
**वित्त विभाग,**
शासन आदेश :- संलेको २०१८/प्र.क्र.१४२/ कोषा प्रशा- २
मंत्रालय, मुंबई- ४०००३२.

दिनांक:- ४ ऑगस्ट, २०१८.

वाचा :- १) वित्त विभाग, शासन आदेश, संलेको २०१७/प्र.क्र.८४/कोषा प्रशा- २, दि.१९.५.२०१८.
२) संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई यांचे क्र. संलेको-प्रशा-राप/का-१/ श्री.बिवलकर/०७.२०१८/५८८, दि.९.७.२०१८

**शासन आदेश**

महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा सह संचालक संवर्गातील अधिकाऱ्यांना संचालक संवर्गामध्ये संदर्भ क्र. १ येथील आदेशान्वये पदोन्नत्या देण्यात आल्या आहेत. सदर पदोन्नती आदेशातील अ.क्र.८ वरील श्री.चं.बा.बिवलकर यांची पदोन्नतीने मुख्य लेखा व वित्त अधिकारी, यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ, नाशिक या पदावर पदस्थापना करण्यांत आली होती. सदर पदोन्नती आदेशानुसार श्री. बिवलकर पदोन्नतीच्या पदावर हजर होण्यासाठी गेले असता, सदर पदावर त्यांना रुजू करुन घेण्यांत आले नसल्याचे संदर्भ क्र. २ येथील पत्रान्वये संचालनालयाने कळविले आहे. त्यामुळे, श्री.बिवलकर, संचालक हे सद्यस्थितीत पदस्थापनेशिवाय आहेत.

२. सद्य:स्थितीत नाशिक महसूली विभागात संचालक दर्जाचे रिक्त पद उपलब्ध नसल्याने, श्री.बिवलकर, संचालक यांना वाटप करण्यात आलेला नाशिक महसुली विभाग बदलून त्यांना कोकण- २ महसुली विभाग वाटप करण्यात येत असून त्यांची त्यांच्या नावासमोर स्तंभ क्र. ४ मध्ये दर्शविलेल्या पदावर पदोन्नतीची सुधारीत पदस्थापना देण्यात येत आहे.

| अ. क्र. | अधिका-याचे नाव | वाटप करण्यात आलेला सुधारीत महसुली विभाग | पदोन्नतीने द्यावयाची सुधारीत पदस्थापना |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १ | श्री.चं.बा.बिवलकर, संचालक | कोकण- २ | मुख्य लेखा अधिकारी, शहर व औद्योगिक विकास महामंडळ मर्यादित, सिडको भवन, नवी मुंबई.<br>(दि.३१.८.२०१८ रोजी सेवानिवृत्तीमुळे रिक्त होणाऱ्या पदावर) |

३. श्री.बिवलकर, संचालक यांनी पदोन्नतीच्या सुधारीत पदस्थापनेच्या ठिकाणी हजर होताच संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई आणि शासनास अवगत करावे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(शुभांगी शेठ)
सहसचिव, वित्त विभाग.

प्रति,
१) संचालक, लेखा व कोषागारे संचालनालय, मुंबई.
२) संचालक, स्थानिक निधी लेखा परीक्षा, कोकण भवन, नवी मुंबई.*
३) महालेखापाल-१/२ (लेखा व अनुज्ञेयता / लेखा परीक्षा) महाराष्ट्र, मुंबई / नागपूर.*
४) मा. मुख्यमंत्री व मा. मंत्री (वित्त) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई